# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-२६४७८७९५/ ५३१/ २९६/ २६४७०९१६ (वै.) फॅक्स : ०२२-२६४७३९७९

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : director@msbte.com


**महत्वाचे परिपत्रक** जा.क्र.मरातंशिमं/का-१०/परीक्षा-२०२०/९८

दिनांक 21 APR 2020

प्रति,
प्राचार्य,
सर्व स्वायत्त तंत्रनिकेतने.

विषय :- शैक्षणिक कार्य व उन्हाळी परीक्षा २०२० बाबत...
संदर्भ :- मंडळाची महत्वाची परिपत्रके
१) क्र. मरातंशिमं/का-१०/परिपत्रक/२०२०, दि. २७.०३.२०२०
२) क्र. मरातंशिमं/का-१०/परीक्षा-२०२०/४०, दि. १६.०४.२०२०

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्र. १ व २ अन्वये लॉकडाऊनच्या कालावधीत Online Platform चा वापर करुन अध्यापकांमार्फत विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करणे तसेच उजळणीसुध्दा घेण्याचे सूचित करण्यात आले होते. तसेच मंडळाशी संलग्नीत सर्व संस्थाच्या मंडळामार्फत घेतल्या जाणा-या चाचणी परीक्षा, प्रात्यक्षिक, सैध्दांतिक परीक्षांबाबतचे सुधारित वेळापत्रक लॉकडाऊन कालावधी संपल्यानंतर व सर्व संस्था पूर्वरत कार्यान्वित झाल्यानंतर मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जारी करण्यात येईल असे कळविलेले आहे.

त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील लॉकडाऊन संपल्याबाबत व शैक्षणिक कामकाज सुरु करण्याबाबतची अधिकृत सूचना शासनाकडून प्राप्त झाल्यानंतर लगेचच मंडळामार्फत घेण्यात येणा-या चाचणी परीक्षा, प्रात्यक्षिक, सैध्दांतिक परीक्षांबाबत शासनाकडून तसेच इतर संबंधित प्राधिकरणाकडून प्राप्त होणा-या निर्देशानुसार परीक्षेबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

महाराष्ट्रातील सर्व तंत्रनिकेतनामध्ये परीक्षा घेण्याबाबत सुसंगतता व सुसूत्रता राखण्याच्या दृष्टीने आपल्या संस्थेतील उन्हाळी परीक्षा २०२० घेण्याबाबतचे धोरण मंडळाच्या तसेच केंद्र व राज्य सरकारच्या संबंधित प्राधिकरणाच्या धोरणानुसार असावे व त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी असे आपणास याद्वारे निर्देशित करण्यात येत आहे.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहिती व कार्यवाहीकरीता –
उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/औरंगाबाद व नागपूर